1993

# कथाशताब्दी

संपादक
विजया राजाध्यक्ष
अशोक रानडे

ग्रंथाली

## जयंत नारळीकर

'समकालीन कथा आणि मी' ह्या विषयावर लिहिताना मला प्रथम ही जाणीव होते की, सामान्य परिभाषेत बसणारा साहित्यिक मी नाही. विज्ञानाशी संबंध असलेल्या काही कथा लिहिण्याचा प्रयत्न मी केला आणि करीत आहे, इतकेच. त्यांना मी विज्ञानकथा म्हणतो. वास्तविक विज्ञानकथा कशी असायला पाहिजे, तिचे कथातंत्र कसे असावे, व्यक्तिचित्रे कशी रेखाटावी, वैज्ञानिक माहिती त्यांत कशी अंतर्भूत व्हावी इत्यादी प्रश्नांवर विचार करायला मी थांबलो नाही. एखादे वैज्ञानिक तथ्य किंवा वैज्ञानिक कल्पना गोष्टीच्या रूपाने मांडावी असे मनात आले की गोष्ट लिहायला घेतली. वैज्ञानिक प्रगतीचे पडसाद समाजात कसे उमटतात हे सांगायलादेखील मी कथेचे माध्यम वापरले. त्यामुळे ह्या निबंधात मी विज्ञानकथांच्या विश्वातच वावरणार आहे.

निबंधाचा आराखडा सुचविण्यात आला होता. त्या अनुषंगाने हे लिहिण्याचा प्रयत्न मी करीत आहे. परंतु ही गाडी नेहमीच रूळावरून जाईल असे आश्वासन मी देऊ शकत

नाही; मात्र रूळावरून घसरली तरी चालू राहील व कुठेतरी जाऊन पोचेल इतके सांगू शकेन.

मी विज्ञानकथा लिहायला केव्हा सुरू केले आणि का केले याबद्दल पूर्वी इतरत्र सविस्तर सांगितले आहे; येथे थोडक्यात आढावा घेतो.

केंब्रिजमधील माझे गुरू फ्रेड हॉयल हे जगविख्यात वैज्ञानिक आहेत, तसेच उत्कृष्ट विज्ञानकथालेखक ही आहेत. त्यांचे उदाहरण माझ्या डोळ्यापुढे होते. त्यांची पहिलीवहिली विज्ञानकादंबरी, 'द ब्लॅक क्लाउड' लिहिताना त्यांच्या मनात अंतराळात रेणूंचे विशाल मेघ असावेत ही कल्पना मांडायची होती. अशा मेघांची कल्पना त्यांनी संशोधनप्रबंधाद्वारे प्रसिद्ध करायचा प्रयत्न केला होता. पण १९५०-६० च्या दशकात अंतराळात हायड्रोजनसारखे अणू आहेत ह्या पलीकडे जायला कोणी वैज्ञानिक धजत नव्हते व म्हणून हॉयल यांच्या कल्पनेला संशोधन नियतकालिकात प्रसिद्धी मिळू शकली नाही. ती त्यांनी विज्ञानकादंबरीमार्गे पुढे आणली. आणि १९६०-७० च्या दशकात सूक्ष्मतरंगाच्या दुर्बिणींनी ह्या मेघांचे अस्तित्व निदर्शनास आणून दिले.

हे उदाहरण एका यशस्वी विज्ञानकथेचे आहे. विज्ञानकथेत प्रस्थापित विज्ञानाच्या पलीकडे जाऊन - मग ते एक पाऊल असो की लांब उडी - कल्पनाविश्वात गोष्ट रंगविण्याचा तो प्रयत्न होता. पण असे यशस्वी प्रयत्न फार नसतात. पुष्कळ विज्ञानकथा 'पडतात' - त्या वेगवेगळ्या कारणांनी. काही, भयकथेत रूपांतरित होऊन, आपले वैज्ञानिकपण हरवतात तर काहीत वैज्ञानिकपणाचा मुलामा वरवरचा असतो, जो बाजूला केला की आतला गाभा अतिसामान्य असतो. हॅनेल, ॲसिमॉव्ह, आर्थर सी क्लार्क इत्यादी मान्यवर विज्ञानकथालेखकांच्या अनेक कथा अशा पडलेल्या आहेत.

तेव्हा हे क्षेत्र दिसते तितके सोपे नाही, याची मला जाणीव होती. त्यातून हा प्रयोग आपल्या मातृभाषेत करून पहावा असे मला वाटत होते... ज्या भाषेत ललितलेखन मी पूर्वी कधी केले नव्हते. फार काय आयुष्यातली पहिली १९ वर्षे बनारसला, हिंदीच्या बालेकिल्ल्यात तर नंतरची १५ वर्षे केंब्रिजला परदेशी घालवली असल्यामुळे समकालीन मराठी साहित्य तर दूर राहो, पण समकालीन मराठी बोलीभाषाही मला तेवढी परिचित नव्हती.

अशा पार्श्वभूमीवर 'किर्लोस्कर'च्या ह. मो. मराठे यांच्या सूचनेवरून 'मूळ कल्पना माझी आणि कथालेखन दुसऱ्या कोणाचे' अशा धर्तीवर प्रयत्न म्हणून मी काही वैज्ञानिक कल्पना सुचवून पाहिल्या होत्या. पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. शेवटी अहमदाबादमध्ये एक कंटाळवाणा सेमिनार ऐकता ऐकता मी, झोप येऊ नये म्हणून, समोरच्या पॅडवर एक गोष्ट लिहायला सुरुवात केली.

'कृष्णविवर' ह्या माझ्या पहिल्या कथेचा जन्म असा सहजपणे झाला. ती मी वेगळ्या नावाने (नारायण विनायक जगताप) आणि वेगळ्या हस्ताक्षरात (पत्नीच्या) मराठी विज्ञान

परिषदेच्या विज्ञानकथास्पर्धेसाठी पाठवली. तिला पहिले पारितोषिक मिळाले आणि पुढे तिचे कौतुक दुर्गाबाई भागवतांनी केले... हा झाला इतिहास.

जरी 'कृष्णविवर' पासून मराठीत विज्ञानकथांना प्रतिष्ठा लाभली असे म्हटले जाते तरी तिच्यापूर्वी अनेक विज्ञानकथा मराठीत लिहिल्या गेल्या आहेत. वामन मल्हार जोशी, द. पां. खांबेटे, नारायण धारप, भा. रा. भागवत आदी नावे अशा कथाकारांत घेता येतील. अशा परिस्थितीत माझ्या कथांमध्ये वेगळे असे काय आहे? पुढे सांगितलेल्या आत्मपरीक्षणात आत्मप्रौढीचा भाग नाही हे आवर्जून सांगतो. जर चर्चासत्राच्या शीर्षकातच 'मी' असेल तर त्या 'मी'ला डावलता येणार नाही- नाईलाज आहे!

माझ्या विज्ञानकथांमध्ये विज्ञानाचा गाभा वेगवेगळ्या स्वरूपात असतो. ते प्रकार असे :-

१) प्रस्थापित विज्ञानाचे काही परिणाम, जे पृथ्वीवर अनुभवता येत नाहीत पण अंतराळात दिसू शकतील. येथे मला माझा खगोलविज्ञानाचा अभ्यास उपयोगी पडला. उदाहरणः 'धूमकेतू', 'पुनरागमन', 'अखेरचा पर्याय', इत्यादी.

२) प्रस्थापित विज्ञानात कल्पनाशक्तीची भर घालून गोष्ट रंगवणे. अशी कथानके आज नाही तर भविष्यकाळात संभाव्य ठरू शकतील. उदाहरण : 'उजव्या सोंडेचा गणपती', 'वामन परत न आला', इत्यादी

३) परकीय जीवसृष्टीशी संपर्क. हा विषय विज्ञानकथालेखकांच्या सर्वांत आवडीचा! उदाहरण : 'यक्षाची देणगी', 'व्हायरस', 'प्रेषित', इत्यादी

४) चमत्कार, बुवाबाजी यांविरुद्ध वैज्ञानिक दृष्टिकोण. उदाहरण : 'पुत्रवती भव', 'पेरूवाडीतील पुष्पक प्रकरण', इत्यादी

५) वैज्ञानिक संशोधनाचे विश्व- वैज्ञानिक शोध कसे लावतात, त्यांना होणारा लालफितीचा त्रास, त्यांचे आपापसातले हेवेदावे. इथे पण मला माझे स्वतःचे अनुभव उपयोगी पडले. उदाहरणः 'धोंडू', 'विज्ञानयुगात नारद', 'आकाशातले डोळे', इत्यादी.

६) एकंदर विश्वाच्या पसाऱ्यात पृथ्वी किती नगण्य आहे, त्यातील मानवाचे स्थान किती तुच्छ आहे हे दाखवणे. उदाहरण : 'स्फोट', 'अथेन्सचा प्लेग', इत्यादी.

अर्थात हे वर्गीकरण पूर्ण नाही. तसेच काही कथा दोन-तीन वर्गांत मोडतात. मला वाटते की अशा मुद्द्यांवर मराठीतून तरी फार कमी विज्ञानकथा लिहिल्या जातात- अर्थात तिसऱ्या मुद्द्याचा अपवाद सोडून. माझ्या गोष्टींमध्ये भयकथेची किंवा परीकथेची छाप नसते, जी अनेक मराठी विज्ञानकथांत दिसून येते. तसेच जीवशास्त्राचा माझा अभ्यास नसल्याने त्यावर मी फारशा कथा लिहिल्या नाहीत. ऐसे पण जीवशास्त्राचा गाभा धरून ज्यांनी कथा लिहिल्यात त्यांनी पण त्यांना भयकथांचे रूप दिलेले बऱ्याचदा आढळून आले आहे. जेथे विज्ञान फक्त काही 'जादू' किंवा अनाकलनीय घडवण्यास वापरले आहे अशा कथांना मी

विज्ञानकथा म्हणत नाही.

आता सांगितलेले काही विषय विज्ञानकथांत मोडतात तर कुठले मोडत नाहीत याचे स्पष्टीकरण एक-दोन उदाहरणे देऊन करतो. 'स्टार वॉर्स' चित्रपटात अंतराळात लांब लांबच्या ग्रहांवर नांदणाऱ्या संस्कृतींचे युद्ध दाखविले आहे. वास्तविक याचे कथानक, पात्रांच्या व्यक्तिरेषा, त्यांच्यातील हेवेदावे वा प्रेमप्रकरणे एखाद्या अमेरिकन वेस्टर्नसारखी आहेत; फक्त अंतराळयाने, विचित्र शस्त्रास्त्रे, प्राण्यांचे विविध प्रकार हा वरवरचा मुलामा आहे. येथे विज्ञानाला वाव काही नाही.

एका मराठी गोष्टीत एक वैज्ञानिक अशी अंगठी तयार करतो, की ती घालणारा अदृश्य होतो. परिकथेतील अंगठीत आणि ह्या अंगठीत मला काही फरक दिसत नाही. काही गोष्टींत प्रकाशाची वेगमर्यादा ओलांडून लोक दूरचे प्रवास करतात. विज्ञानात अजून पुष्कळ प्रगती व्हायची आहे. प्रकाशवेगमर्यादा ओलांडता येत नाही हा प्रस्थापित नियम कदाचित् पुढे-मागे बदलेलही. पण तो का बदलला, ह्याबद्दल थोडे विचारमंथन हवे. नाहीतर ती गोष्ट 'जादू'च्या प्रकाराचीच राहते.

काही सुप्रस्थापित लेखकांच्या गोष्टीत फॅण्टसी असते. आर्थर सी क्लार्कच्या गोष्टीवर आधारलेल्या गाजलेल्या '२००१ स्पेस ऑडिसी' ह्या चित्रपटात उत्कृष्ट विज्ञानकथेबरोबर फॅण्टसीचे मिश्रण आढळते. फॅण्टसी हा प्रकार मला विज्ञानकथेच्या संदर्भात रुचत नाही. निदान कथेच्या मार्गाने विज्ञान लोकाभिमुख करायचे असेल तर फॅण्टसीच्या मिश्रणाने त्याला अडथळा पोचतो.

कथेच्या मार्गाने विज्ञान लोकाभिमुख करावे, असे माझे मत आहे. ज्याप्रमाणे सरळ शिक्षण न देता, गोष्टी सांगून, विष्णुशर्म्याने पंचतंत्रातील द्वाड धनिकपुत्रांना शहाणपण शिकविले तसे विज्ञानकथा सांगून बरेच काही साधता येईलः-

लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवता येईल,

विज्ञानाबद्दलची अनास्था दूर करता येईल,

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अनियंत्रित वापरातले धोके स्पष्ट करता येतील,

भविष्यकाळातील समाजाचे चित्र रेखाटता येईल, ज्याचा योजना आखण्यास उपयोग होईल,

प्रत्यक्ष वैज्ञानिक शोधांना नवी दिशा दाखविता येईल,

इत्यादी. इत्यादी. इत्यादी.

इथे साहित्यिक म्हणतील की साहित्यसृजन हे उद्दिष्टासाठी नसावे. कथा केवळ साहित्याचा आनंद लुटण्यासाठी लिहिली जावी... आणि एक हेतू साध्य करायला नव्हे. मग संतवाङ्मयाला साहित्य म्हणायचे का? स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांमध्ये देशभक्ती जागृत करण्यासाठी केलेले ललितलेखन साहित्य म्हणायचे का? दलितांना समाजात

न्याय आणि प्रतिष्ठा मिळावी ह्या हेतूने केलेले लेखन साहित्य म्हणायचे का?

'रामचरितमानस' लिहिताना तुलसीदासाने म्हटले आहे. "स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथां भाषा निबंधमतिमंजुलमातनोति". पण ते वाचताना त्यामागचा समाजप्रबोधनाचा हेतूपण डोकावतो. मग विज्ञानकथा समाजप्रबोधनासाठी का लिहिल्या जाऊ नयेत?

समकालीन कथांसंबंधी लिहिताना टीकाकारांबाबत पण काही मुद्दे मांडावेसे वाटतात. असे म्हटले जाते की काही लोक साहित्यनिर्मिती करतात, तर काही त्यावर टीका करतात. मला वाटते की वास्तविक इथे त्रिकोण असतो, ज्याचे तीन शीर्षक असतातः साहित्य-निर्मिती करणारा, त्यावर टीका करणारा, आणि ती निर्मिती ज्याच्याकरता प्रसिद्ध केली तो वाचकवर्ग. त्यापैकी माझा वाचकवर्गाशी चांगला सुसंवाद साधला आहे. मला विज्ञानकथा-कादंबऱ्या आवडल्याच्या पुष्कळ पावत्या विभिन्न वर्गातल्या व वयोगटांतल्या वाचकांकडून वेळोवेळी मिळत आल्या आहेत. काही वाचकांनी विज्ञानकथेतली मांडणी तर्कशुद्ध असावी असे गृहित धरून काही प्रश्न विचारले. 'अमुक पात्राने अमुक प्रसंगी असा निर्णय का घेतला?' किंवा 'असे घडले असताना घटनाचक्र त्या दिशेने का फिरले?' अशा तऱ्हेच्या शंकांचे समाधान करताना मला ही गोष्ट (किंवा कादंबरी) वाचकाने विचारपूर्वक वाचली आहे याचे समाधान वाटले.

ह्या वाचकांच्या प्रतिसादाला लेखकाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे- निदान मी तरी देतो. एखाद्या गायकाला किंवा वादकाला श्रोत्यांकडून लगेच प्रतिसाद मिळतो. नाटककाराला प्रेक्षक प्रतिसाद देतात. तसे आपले लिखाण कितपत आवडले हे लेखकाला वाचकांच्या पत्रांतूनच कळते. अशी पत्रे स्वयंस्फूर्त असतात. लेखकाशी संवाद साधावा असे वाचकांना वाटणे ही त्या साहित्यकृतीला मिळालेली पावती आहे, जिच्याबद्दल मी वाचकांचा आभारी आहे.

टीकाकारांचा दृष्टिकोन वेगळा असतो. माझ्या कथांवर वृत्तपत्रांतून आणि नियतकालिकांतून बऱ्या टीका-समीक्षा आलेल्या आहेत. ज्याप्रमाणे वेगवेगळ्या ज्योतिषांनी केलेले निदान बरे, वाईट, दोन्ही प्रकारचे असते व सूज्ञ माणसाने त्यावर विश्वास ठेवू नये आणि स्वतःचे निर्णय तर्कशुद्ध विचारसरणीने घ्यावेत, तसेच माझे टीकाकारांबद्दल मत झाले आहे. माझी कथा एका टीकाकाराने उचलून धरली म्हणून चांगली आणि दुसऱ्याने हाणून पाडली म्हणून वाईट, असे असेल तर मी पुढील लेखन कसे करावे ह्याबद्दल त्यातून मला मार्गदर्शन मिळत नाही. लहानपणी वाचलेली गोष्ट आठवते. बाप, मुलगा, आणि गाढवाची. मुलाने गाढवावर बसायचे का बापाने, का दोघांनी, का कोणीच नाही? का दोघांनी गाढव उचलून न्यायचे? टीकाकार कुठल्याही पर्यायावर टीका करतात.

त्यामुळे माझ्या गोष्टींवरील समीक्षा वाचून मला आता माझ्या साहित्यकृतींचे

मूल्यमापन करता येत नाही, समीक्षकाचे मात्र करता येते! समीक्षेबाबत लेखकाने स्थितप्रज्ञ असावे असे मला वाटते. तरीपण समीक्षा आणि समीक्षकांबद्दल चार मुद्दे मला मांडावेसे वाटतात. त्यापैकी पहिले दोन सामान्य स्वरूपाचे, तर नंतरचे दोन माझ्या कथांबद्दलचे आहेत.

१) काही समीक्षा (विशेषकरून समीक्षांना वाहिलेल्या किंवा एकंदरीत साहित्यात उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या नियतकालिकांतल्या) क्लिष्ट, अतिसुसंस्कृत मराठी वापरतात. इथे लेखकाला (म्हणजे समीक्षा लिहिणाऱ्याला) असे वाटत असावे, की आपल्या शब्दपांडित्याने दिपून जाऊन वाचक आपण केलेले मूल्यमापन आपोआप स्वीकारेल. एक उदाहरण पहा:

"... तरी यापुढे जाऊन निर्देशनात्मक रचनांतरणवादी भाषाविज्ञानाच्या साहाय्याने मराठीतील भाषावैज्ञानिक प्रश्नांची उकल आणखी स्पष्ट आणि सुकर होते की काय हेही पाहणे महत्त्वाचे ठरावे."

सुदैवाने ही समीक्षा माझ्या कृतीवरील नाही. ज्याच्या कृतीवर असेल त्या लेखकाला कदाचित् कळलीही असेल.

२) प्रतिष्ठित साहित्यसमीक्षकाकडून आपल्या कृतीचे समीक्षण व्हावे असे लेखकाला वाटणे साहजिक आहे. टाईम्स लिटररी सप्लिमेंटसारख्या प्रख्यात नियतकालिकात नाणावलेले समीक्षक पुस्तकपरीक्षणे करतात. मराठीतही अशी नियतकालिके आहेत, त्यातील 'आलोचना' हे एक. माझ्या कथेवरील आलोचना त्यांत आल्या आहेत. पण त्यांत समीक्षकांची नावे समीक्षेनंतर दिली जात नाहीत. एक उदाहरण : 'यक्षाची देणगी' वरील लेख डिसेंबर १९७३ च्या अंकात आहे (पान ९). पण तो कोणी लिहिला याचा तो अंक चाळून बोध होत नाही. बाण मारायचा किंवा पुष्पवृष्टी करायची, ती झाडाआडून का? समीक्षकाचे नाव लेखाबरोबर देण्याचे टाळण्यामागे कोणती संपादकीय प्रेरणा आहे?

३) एक-दोन समीक्षकांनी माझ्या कथांबद्दल आक्षेप घेतला, की त्यांत मराठी पारिभाषिक शब्द न वापरता इंग्रजी शब्दांचे प्रमाण जास्त आहे. वास्तविक समकालीन कथांच्या संदर्भात हा आक्षेप बरोबर नाही. एक तर अनेक सामाजिक कथांमध्ये इंग्रजी शब्दांचा सर्रास वापर होताना दिसतो. उच्चभ्रू व्यावसायिक क्षेत्रातल्या पात्रांच्या तोंडी तर ते शब्द असतातच, पण लेखकाच्या स्वतःच्या वर्णनातही. मी येथे उपस्थित साहित्यिकांना आव्हान देतो. त्यांनी एक दिवस इंग्रजी शब्दांचा उपास करून दाखवावा - म्हणजे त्या दिवशी त्यांनी शुद्ध मराठी बोलायचे!

वस्तुस्थिती अशी आहे, की विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषा इंग्रजी होत चालली आहे आणि तिचे पडसाद समाजात उमटतात. दुसऱ्या भाषांचे शब्द आत्मसात करूनच इंग्रजी भाषा

टणक झाली. आपणही प्रचारात असलेले इंग्रजी शब्द मराठीत का आणू नयेत? का त्याने अपचन होईल इतकी आपली भाषा तकलादू आहे? आणि असे शब्द मराठी विज्ञानकथांत सहजपणे आले तर काय बिघडले?

४) साहित्यनिकषांच्या बाबींवरून माझ्या कथांचे मूल्यांकन समीक्षकांनी करोही करावे- माझा त्याबद्दल वाद नाही. प्रत्येकाचे मानदंड वेगळे असतात हे मी आधीच सांगितले. पण चुकीच्या माहितीवर आधारलेली विधाने निव्वळ खोडसाळपणाची असतात, हे सांगावेसे वाटते. काही उदाहरणे देतो. ह्या सर्वांच्या मुळाशी समीक्षकांचे गृहीतक असे: माझ्या विज्ञानकथा फ्रेड हॉयेलच्या कथांवर आधारलेल्या किंवा नक्कल केलेल्या आहेत.

पहिले उदाहरण : माझी 'धूमकेतू' ही कथा फ्रेड हॉयेलच्या 'ऑक्टोबर द फर्स्ट इज टू लेट' या कादंबरीची नक्कल आहे. चौकशीअंती असे कळले, की समीक्षकाने हॉयेलची कादंबरी वाचली नव्हती. साम्य इतकेच की 'धूमकेतू'मध्ये एक ऑक्टोबर तारखेला काही तरी घडणार होते! हॉयेलच्या कादंबरीचे कथानक अगदीच वेगळे, आणि त्यात धूमकेतू नव्हताच.

दुसरे उदाहरणः हॉयेलनी हिमयुग कसे अवतरते याबद्दल स्वतःचे सिद्धांत मांडणारे एक पुस्तक लिहिले. ते वैज्ञानिक पुस्तक आहे. ती वैज्ञानिक कादंबरी नव्हे. त्या वैज्ञानिक कल्पनेवर आधारित 'हिमप्रलय' ही कथा 'किर्लोस्कर' मध्ये मी लिहिली. शेवटी हॉयेलच्या वैज्ञानिक कल्पनेचा ऋणनिर्देशपण केला होता. पण टीकाकाराने ठोकून दिले, की ही कथा हॉयेलच्या मूळ कथेवरून घेतली आहे.

सर्वांत गंमत म्हणजे 'यक्षाची देणगी' मध्ये 'नौलखाहाराचे प्रकरण' ही शेरलॉक होम्स पात्र असलेली गोष्ट आहे. त्यात खाली 'The case of the Emerald Necklace' ह्या गोष्टीचा स्वैर अनुवाद असे म्हटले आहे. वास्तविक ती गोष्ट माझीच आहे! कॉनन डॉयलच्या इंग्रजीचा शाब्दिक अनुवाद दिसावा अशा भाषेत लिहिण्याचा तो उपक्रम होता. पण टीकाकाराने संशोधन करून कॉनन डॉयलच्या 'ओपेल टियारा' गोष्टीचे हे भाषांतर असल्याचे सांगितले. समग्र शेरलॉक होम्समध्ये ह्या नावाची गोष्टच नाही!

समकालीन विज्ञानकथांच्या संदर्भात मला इतकेच सांगायचे होते. आयोजकांनी कळविलेले मुद्दे त्यांत आलेत ; आणि त्यांच्या अनुषंगाने आणखी काही.

जयंत नारळीकर ह्यांना विचारले गेलेले प्रश्न आणि त्यांची उत्तरे:

१) आपल्याला आवडलेले पाश्चिमात्य विज्ञानकथाकार कोणते? त्यांच्या काही विशेष उत्तम कथांचा निर्देश कराल काय?

उत्तरः- १) फ्रेड हॉयेल, रे ब्रॅडबरी, आर्थर सी क्लार्क आणि आयझॅक ॲसिमॉव्ह हे आधुनिक विज्ञानकथाकारांत, माझ्या मते, अग्रगण्य आहेत. पूर्वीच्या जमान्यातील ज्यूल्स व्हर्न आणि एच.जी. वेल्स श्रेष्ठ विज्ञानकथालेखक आहेत. ह्या सर्वही लेखकांच्या

सर्वच कादंबऱ्या उत्कृष्ट होत्या असे मला वाटत नाही. त्यातील गाजलेल्या थोड्याच होत्या. पण त्या निवडक कथांनी विज्ञानसाहित्याचे नाव प्रतिष्ठित केले. काही उदाहरणे: द ब्लॅक क्लाउड (फ्रेड हॉयेल), २००१, ए स्पेस ऑडिसी (आर्थर क्लार्क), राउंड द वर्ल्ड इन एटी डेज (ज्यूल्स व्हर्नःही विज्ञानकथाच आहे!), द टाईम मशीन (वेल्स)

२) विज्ञानसाहित्याबद्दल- 'It is neither science nor fiction'- असे म्हटले जाते. तुमची प्रतिक्रिया काय?

उत्तरः- २) ह्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे उत्कृष्ट विज्ञानकथेत विज्ञान आणि कथेचा अद्भुत संगमही पहायला मिळतो.

३) विज्ञानकथा हे लेबल लावण्यामागील एकच एक अशी काही भूमिका आहे काय? कोणती?

उत्तरः-३) कुठल्या कथेला विज्ञानकथा म्हणावे याबद्दलचे विचार मी माझ्या निबंधात मांडले आहेत. दुसऱ्या कोणाचे निकष वेगळे असू शकतील - किंबहुना आहेतच. मराठीतच नव्हे पण इंग्रजीत विज्ञानकथेच्या लेबलखाली बरेच निकृष्ट वाङ्मय दरवर्षी प्रसिद्ध होते.

४) विज्ञानकथेतील कालसंकल्पना कशी असते?

उत्तरः-४) विज्ञानकथेत वेगळी कालसंकल्पना असते असे मला वाटत नाही. 'काल' हा सातत्याने 'वहात जाणारा' व निरपेक्ष असतो अशी पूर्वकल्पना आता वैज्ञानिक मानत नाहीत. याचे प्रतिबिंब काही कथांत उमटते.